न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवडमध्ये ग्रीन सोसायटींना करसवलत

## कचरा व्यवस्थापन, पाणी पुनर्वापर आणि सौर ऊर्जेसाठी 10-15% सवलत; पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने महापालिका प्रभावीपणे काम करत असून, आरोग्य विभागाच्या माझी वसुंधरा 6.0 अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रीन सोसायटी उपक्रम राबविण्यात येत आहे. हे उपक्रम प्रभावीपणे राबविणाऱ्या सोसायट्यांना 10 ते 15 टक्क्यांपर्यंत करसवलतीचा लाभ मिळणार आहे.

पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल तसेच उप आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम शहरभर प्रभावीपणे राबविला जात आहे. रॉयल कॅसल सोसायटीमध्ये वसुंधरा संवर्धनाला केंद्रस्थानी ठेवून विविध प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

कचरा व्यवस्थापन व कंपोस्टिंग प्रकल्पाद्वारे ओल्या कचऱ्याचे खतामध्ये रूपांतर केले जात आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पामुळे पावसाच्या पाण्याचे संकलन करून त्याचा पुनर्वापर केला जातो. ग्रे वॉटर प्रकल्पामुळे वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करून पाणी बचतीस हातभार लागतो. तसेच, सौर ऊर्जा प्रकल्पाद्वारे स्वच्छ आणि पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर करण्यात येत आहे. 'महापालिकेकडून 5-स्टार सोसायटी' म्हणून विशेष मानांकन दिले जाते.

तसेच, एकापेक्षा अधिक प्रकल्प प्रभावीपणे राबविणाऱ्या सोसायट्यांना 10 ते 15 टक्क्यांपर्यंत करसवलतीचा लाभ मिळतो. 'ग' क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य निरीक्षक स्नेहल सुकटे, आरोग्य सहाय्यक प्रशांत गोठे, प्रदीप सोनवणे यांच्या प्रयत्नांतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि शाश्वत बनविण्याच्या दिशेने महापालिका प्रभावीपणे काम करत असून, आरोग्य विभागाच्या माझी वसुंधरा 6.0 अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रीन सोसायटी उपक्रम राबविण्यात येत आहे.

### पर्यावरणपूरक सोसायट्यांना प्रोत्साहन

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'ग्रीन सोसायटी' उपक्रमांतर्गत पर्यावरणपूरक प्रकल्प राबविणाऱ्या सोसायट्यांना १० ते १५ टक्क्यांपर्यंत करसवलत दिली जात आहे. कचरा व्यवस्थापन, कंपोस्टिंग, रेन वॉटर हार्वेस्टिंग, ग्रे वॉटर पुनर्वापर आणि सौर ऊर्जा यांसारख्या उपक्रमांमुळे सोसायट्या स्वच्छ आणि शाश्वत जीवनशैलीकडे वाटचाल करत आहेत. अशा उपक्रमांमुळे शहर हरित आणि पर्यावरणपूरक बनण्यास मोठी मदत होत असून, नागरिकांचाही सहभाग वाढत आहे.

> कचरा व्यवस्थापन, पाणी पुनर्वापर आणि अक्षय ऊर्जेचा वापर या बाबींची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. महापालिकेच्या पुढाकारामुळे शहरात वसुंधरापूरक बदल घडत असून, भविष्यातील पिढ्यांसाठी हे उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.
>
> - डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

# पवना नदी काठावर 'जागतिक जल दिन' उत्साहात

## महापालिकेतर्फे स्वच्छता मोहीम, जनजागृती आणि पाणी बचतीची सामूहिक प्रतिज्ञा



**पिंपरी | प्रतिनिधी**

जागतिक जल दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभाग व पाणीपुरवठा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट, पिंपरी यांच्या सहकार्याने रावेत बंधारा येथील पवना नदी काठावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात जागतिक जल दिनाचे महत्त्व, पाण्याचे संवर्धन, जलस्रोतांचे वाढते प्रदूषण तसेच नदी, नाले आणि पाणवठ्यांच्या स्वच्छतेची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून करण्यात आली. त्यानंतर नदीकाठ व परिसरात स्वच्छता मोहीम राबवून प्रत्यक्ष कृतीद्वारे जनजागृती करण्यात आली.

या उपक्रमादरम्यान उपस्थित सर्वांनी पाण्याची बचत व संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घेतली. पाणीपुरवठा विभागामार्फत पाणी बचतीचे महत्त्व आणि सध्याच्या काळातील गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. स्वच्छता मोहिमेनंतर महानगरपालिकेचे कर्मचारी व डी. वाय. पाटील कॉलेजचे विद्यार्थी यांनी पवना नदी काठावर जनजागृतीपर रील्स तयार करून या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट, सोहन निकम, उपअभियंता पंकज फेंडे, प्रीती गाडे तसेच पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश बरीदे, उपअभियंता प्रवीण धुमाळ व दोन्ही विभागांचे कनिष्ठ अभियंते उपस्थित होते. तसेच डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजच्या मुख्य समन्वयक डॉ. गौरी पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन केले.

> "आजच्या वाढत्या शहरीकरण आणि हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पाण्याचे संवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी बनली आहे. नदी, नाले आणि जलस्रोत स्वच्छ ठेवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि पुढील पिढ्यांसाठी पाणी जतन करणे आवश्यक आहे. अशा जनजागृती उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो आणि पर्यावरण संरक्षणाला बळकटी मिळते."
>
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.

# शालेय स्तरावर पथनाट्याद्वारे वसुंधरा जनजागृतीला चालना

## ‘माझी वसुंधरा 6.0’ अंतर्गत वाकडमध्ये उपक्रम; स्वच्छता व पर्यावरणाचा संदेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "माझी वसुंधरा ६.०" अभियानांतर्गत वाकड गावठाण परिसरात पथनाट्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता व वसुंधरा संवर्धनाची प्रभावी जनजागृती करण्यात आली.

जागतिक हवामान दिनानिमित्त पि. चि. मनपा शाळा, वाकड गावठाण येथे सादर करण्यात आलेले पथनाट्य विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, प्रेरणा आणि वसुंधरा प्रबोधनाचा अनोखा संगम ठरले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सहा.आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, सहा. आरोग्य अधिकारी शांताराम माने, मुख्य आरोग्य निरीक्षक योगेश फल्ले आणि आरोग्य निरीक्षक कोमल फर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.



### पथनाट्यातून पर्यावरण जनजागृती

» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ‘माझी वसुंधरा ६.०’ अभियानांतर्गत वाकड गावठाण येथे पथनाट्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमात हवामान बदलाची कारणे, परिणाम आणि उपाययोजना नाट्यरूप सादरीकरणातून मांडण्यात आल्या. तसेच कचरा व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक दाखवून ओला व सुका कचरा विलगीकरणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे.

उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये पथनाट्याच्या माध्यमातून स्वच्छता, हवामान बदल आणि पर्यावरण संरक्षणाचे संदेश, हवामान बदलाची कारणे, त्याचे गंभीर परिणाम तसेच दैनंदिन जीवनात करता येणाऱ्या सोप्या उपाययोजनांची माहिती नाट्यरूप सादरीकरणातून देण्यात आली.

स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगताना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी कचऱ्याचे विलगीकरण तसेच घरच्या घरी सेंद्रिय खत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ माहितीच नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता सवयी, कचरा व्यवस्थापनातील सुधारणा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारण्याबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होत आहे. लहान वयातच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वाची भूमिका असल्याचे मत सहा. आयुक्त किरणकुमार मोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

> माझी वसुंधरा ६.० अभियानाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाची जाणीव समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. विशेषतः शालेय स्तरावर अशा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाबाबतची जागरूकता निर्माण होत आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमामुळे विद्यार्थी केवळ संदेश आत्मसात करत नाहीत, तर ते आपल्या दैनंदिन जीवनातही त्याची अंमलबजावणी करण्यास प्रेरित होतात. यामुळे भविष्यात पर्यावरणपूरक आणि जबाबदार नागरिक घडण्यास मोठी मदत होणार आहे.
>
> - विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> आजचे विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्यामध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीबाबतची जाणीव लहान वयातच निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमातून दिला जाणारा संदेश त्यांच्या मनावर दीर्घकालीन परिणाम करतो. ‘माझी वसुंधरा’सारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थी केवळ जागरूकच होत नाहीत, तर ते आपल्या कुटुंबात आणि समाजातही सकारात्मक बदल घडवून आणण्याचे कार्य करतात.
>
> - डॉ. प्रदीप ठेंगल, उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी-चिंचवड मेट्रो कामामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था

## निगडी-आकुर्डी मार्ग धोकादायक; चिखल व साहित्यामुळे अपघातांचा धोका वाढला

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी ते आकुर्डी मार्गावर सुरू असलेल्या मेट्रो बांधकामामुळे रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. चिखल व साचलेल्या बांधकाम साहित्यामुळे हा मार्ग अत्यंत धोकादायक बनला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना या परिस्थितीचा मोठा फटका बसत असून, किरकोळ अपघातांची मालिका सुरूच आहे. मात्र, गंभीर अपघाताचीदेखील दाट शक्यता वर्तविली जात आहे



पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते भक्ती-शक्ती मार्गात सुरू असलेल्या मेट्रोच्या कामासाठी रस्त्याच्या मधोमध उभारण्यात येणाऱ्या पिलरमुळे अनेक ठिकाणी लोखंडी पत्रे टाकण्यात आली आहेत. मात्र, ही पत्रे काही ठिकाणी अपुरी पडत असल्याने बांधकामासाठी वापरले जाणारे दगड, विटा, मुरूम आणि वाळू हे थेट रस्त्यावर पसरले आहे. यासोबतच बांधकामासाठी वापरलेले पाणी रस्त्यावर वाहत येऊन चिखल तयार होत आहे. परिणामी रस्ता निसरडा झाला असून वाहन चालवणे धोकादायक ठरत आहे.

दुचाकीस्वारांना विशेषतः संतुलन राखताना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकांनी घसरून किरकोळ दुखापती झाल्याच्या घटना समोर येत आहेत. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

### नागरिकांची मागणी

- » रस्त्यावरचे बांधकाम साहित्य तात्काळ हटवावे.
- » नियमित साफसफाई करावी.
- » सुरक्षित व सुनिश्चित वाहतूक व्यवस्था करावी.
- » संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना कराव्यात.

या सर्व कारणांमुळे मोठ्या अपघाताचा धोका वाढला आहे. दरम्यान, शहरातील अग्निशमन विभागाने पुढाकार घेत मेट्रो प्रशासन आणि महापालिकेच्या आरोग्य विभागाला याबाबत माहिती दिली. तरीही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहेवाहनचालकांनीही सावधगिरी बाळगण्याचे आवाहन करण्यात येत आहे. मात्र, केवळ नागरिकांच्या सतर्कतेवर अवलंबून राहून चालणार नाही, तर प्रशासनानेही तातडीने या समस्येकडे लक्ष देणे गरजेचे आहे. एकूणच, विकासकामांच्या नावाखाली नागरिकांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पुण्यात 'मेट्रोपॉलिटन सर्व्हिलन्स युनिट' प्रकल्पावर संकट

## केंद्राचा निधी लॅप्स होण्याची शक्यता; आरोग्य विभागाकडून प्रकल्प कायम

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेने जावळे भवन येथे काही महिन्यांपूर्वीच दिमाखात 'मेट्रोपॉलिटन सर्व्हिलन्स युनिट'चा श्रीगणेशा केला. महापालिकेच्या 'ड्रीम प्रोजेक्ट'साठी केंद्र शासनाकडून निधीही मिळाला होता. मात्र, अवघ्या सहा महिन्यांतच सर्व्हिलन्स युनिटऐवजी क्षेत्रीय कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जागेअभावी केंद्राकडून कोट्यवधींचा निधी परत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कोरोना महामारीच्या काळात 2021 मध्ये केंद्र सरकारने सर्व राज्यांना शहरांमध्ये विशेष सर्व्हिलन्स युनिट उभारण्याचे निर्देश दिले होते. संसर्गजन्य किंवा नव्या आजारांची असामान्य वाढ वेळीच ओळखता येईल, हा यामागील हेतू होता. यासाठी 10 शहरांची निवड करण्यात आली. त्यामध्ये पुणे शहरालाही स्थान मिळाले.

जागेअभावी या प्रकल्पाला विलंब झाला. पूर्वी नायडू रुग्णालयाच्या सहाव्या मजल्यावर जागा प्रस्तावित होती; मात्र ती केंद्र सरकारच्या निकषांनुसार योग्य न ठरल्याने जावळे भवन येथील जागा निश्चित करण्यात आली. सुमारे 6 हजार चौरस फूट क्षेत्रात एमएसयू उभारण्यात येणार होते. केंद्र शासनाच्या समितीने जागेची पाहणी केल्यावर सप्टेंबर 2025 मध्ये युनिट कार्यान्वित करण्यात आले. गेल्या सहा महिन्यांपासून हे युनिट कार्यरत असून, खासगी व शासकीय रुग्णालये, प्रयोगशाळा आणि क्लिनिक कडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे आजारांची नोंद ठेवण्याचे काम सुरू आहे. या डेटाबेसमुळे अचानक वाढणाऱ्या आजारांवर नियंत्रणासाठी प्रशासनाला तयारी करता येते. याच ठिकाणी 'बायोसेफ्टी रिसर्च लॅबोरेटरी (बीएसएल-2)' उभारण्याचाही प्रस्ताव होता. आता युनिट स्थलांतरित केल्यास निधी लॅप्स होण्याची आणि प्रकल्प बंद होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. काही महिन्यांपूर्वीच दिमाखात 'मेट्रोपॉलिटन सर्व्हिलन्स युनिट'चा श्रीगणेशा केला. महापालिकेच्या 'ड्रीम प्रोजेक्ट'साठी केंद्र शासनाकडून निधीही मिळाला होता. मात्र, अवघ्या सहा महिन्यांतच सर्व्हिलन्स युनिटऐवजी क्षेत्रीय कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




### आरोग्य विभागाचे 'एमएसयू'साठीचे प्रयत्न जाणार वाया

» स्थायी समितीने अलीकडेच एमएसयू उभारणीचा ठेका रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसाधारण सभेत एमएसयूचा ठेका रद्द करून त्या ठिकाणी वॉर्ड कार्यालय उभारण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. ही जागा मिळविण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न केले होते. हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून, तो आजारांच्या वाढीचे वेळीच निदान करण्यात मदत करतो. स्वाइन फ्लू, कोविड-19 आणि अलिकडील जीबीएससारख्या आजारांचा अनुभव पाहता अशा यंत्रणेची गरज अधिक आहे.

### 'एमएसयू सध्याच्या ठिकाणीच सुरू ठेवावा!'

» आरोग्य विभागाने आयुक्तांकडे सविस्तर प्रस्ताव सादर करीत एमएसयू सध्याच्या ठिकाणीच सुरू ठेवण्याची विनंती केली आहे. जागा बदलल्यास नवीन जागा शोधणे, ताबा घेणे आणि काम सुरू करणे, या सर्व प्रक्रिया मार्चअखेरच्या मुदतीत पूर्ण करणे शक्य होणार नाही. प्रकल्प वेळेत पूर्ण न झाल्यास तो रद्द होण्याची शक्यता असून, याचा शहराच्या सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असे पत्रात नमूद केले आहे.

> वॉर्ड कार्यालय आणि एमएसयू या दोन्हींचा समतोल साधणे गरजेचे आहे. हा केंद्र सरकारचा प्रकल्प असल्याने त्याचे महत्त्व कमी करता येणार नाही. एमएसयूसाठी पर्यायी जागा शोधली जाईल आणि आवश्यक पायाभूत सुविधा व मनुष्यबळात कोणतीही तडजोड केली जाणार नाही.
>
> - नवल किशोर राम, महापालिका आयुक्त

# पुण्यात गॅसपुरवठा पूर्वपदावर; 83 हजार सिलिंडरचे वितरण

## बुकिंगला प्राधान्य; पुढील काही दिवसांत वेटिंग ग्राहकांना दिलासा मिळणार

**पुणे | प्रतिनिधी**

युद्धजन्य परिस्थितीत निर्माण झालेल्या गॅस टंचाईनंतर आता घरगुती गॅसपुरवठा पूर्वपदावर येत आहे. शनिवारी दिवसभरात 72 हजार बुकिंग, तर 83 हजार सिलिंडरचे वितरण केल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे.

सामान्यांना सिलिंडरचे वितरण सुरळीत व्हावे, यासाठी यापूर्वी बुकिंग केलेल्या ग्राहकांनाच प्राधान्य द्यावे, अशा सक्त सूचना जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सींना दिल्या आहेत. त्यामुळे ज्या एजन्सीधारकांकडे अधिक बुकिंग आहे, त्यांना प्राधान्याने सिलिंडरचे वितरण करण्यात येत आहे. वेटिंगवरील ग्राहकांना प्राधान्याने सिलिंडर देण्यासाठी संबंधित एजन्सींना अधिकचा पुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे मागणी व पुरवठा यातील तफावत पुढील तीन ते चार दिवसांत सामान्य होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

जिल्ह्यात शनिवारी 70 हजार 859 गॅस सिलिंडरचे बुकिंग करण्यात आले होते. तर कंपन्यांकडून 90 हजार 001 सिलिंडरचे एजन्सींना वितरण करण्यात आले. तसेच एजन्सींकडून प्रत्यक्ष ग्राहकांना 83 हजार 440 सिलिंडरचे वितरण झाले.

त्यामुळे मागणीपेक्षा सुमारे 13 हजार अधिक सिलिंडर देण्यात आले आहेत. यात जुन्या बुकिंगचाही समावेश आहे. पुढील तीन ते चार दिवसांत वेटिंगवरील सर्व ग्राहकांना सिलिंडरचे वितरण करण्यात येईल व त्यानंतर मागणीनुसार संपूर्ण पुरवठा त्या त्या दिवशी सुरळीत होईल, अशी माहिती जिल्हापुरवठा अधिकारी महेश सुधळकर यांनी दिली.



### गॅसपुरवठा पूर्वपदावर

» युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईनंतर आता घरगुती गॅसपुरवठा पूर्वपदावर येत आहे. शनिवारी जिल्ह्यात ७० हजारांहून अधिक बुकिंग नोंदवण्यात आले, तर ८३ हजारांहून अधिक सिलिंडरचे प्रत्यक्ष वितरण करण्यात आले. मागणीपेक्षा अधिक सिलिंडर उपलब्ध करून देत प्रलंबित बुकिंग पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सींना पूर्वी बुकिंग केलेल्या ग्राहकांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले असून, पुढील तीन ते चार दिवसांत गॅसपुरवठा पूर्णपणे सुरळीत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, काही एजन्सीधारकांनी जिल्हा प्रशासनाने दिलेल्या 96 तासांच्या आत वितरणाच्या अटीबाबत नाराजी व्यक्त केली. या कालावधीत सिलिंडर पुरवणे अवघड असल्याचे या एजन्सीधारकांचे म्हणणे आहे. मात्र, घरपोच वितरणाची व्यवस्था असलेल्या एजन्सीधारकांना या स्वरुपाची अडचण आलेली नाही. त्यामुळे वितरणाची व्यवस्था नसलेल्या एजन्सींनी ती तातडीने करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आल्याचे सुधळकर यांनी सांगितले.

# लोहगावातील 48 एकर आरक्षण हटवून 'भारत मंडपम्'

## नागरी सुविधांना कात्री, बिल्डर हितसंबंधांच्या चर्चेमुळे राजकीय वातावरण तापले

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळालगत असलेल्या तब्बल 48 एकरांवरील रुग्णालय, उद्यान, वाहनतळ, मंडई, रस्ता, क्रीडांगण, पाणीपुरवठा केंद्र, अशी महत्त्वाची आरक्षणे उठवून त्यावर 'भारत मंडपम्'चे आरक्षण ठेवण्याचा प्रस्ताव आज सोमवारी होणाऱ्या मुख्य सभेत मंजुरीस ठेवण्यात आला आहे. धक्कादायक म्हणजे विकास नियंत्रण नियमावलीत 'भारत मंडपम्'चे आरक्षण हा प्रकार नसतानाही कायदेशीर नियम धाब्यावर बसवून आरक्षण उठविण्याची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. काही बड्या बिल्डरांचे हितसंबंध डोळ्यांसमोर ठेवून हे आरक्षण उठविण्याचा घाट घातला गेला आहे.

लोहगाव सर्व्हे नंबर 236, 238 हा तब्बल 48 एकरांचा भूखंड विमानतळालगत आहे. विमाननगरमधील अतिशय मोक्याचा भूखंड आहे. त्यावर महापालिकेच्या विकास आराखड्यात सर्व नागरीहिताची आरक्षणे आहेत. मात्र, राज्य शासनानेच ही आरक्षणे उठविण्याचा घाट घातला आहे.



### आरक्षण रद्द करण्याचा प्रस्ताव

» लोहगाव विमानतळालगतच्या ४८ एकर जागेवरील रुग्णालय, उद्यान, क्रीडांगण, वाहनतळ, मंडई यांसारखी महत्त्वाची नागरी आरक्षणे उठवून त्या ठिकाणी 'भारत मंडपम' उभारण्याचा प्रस्ताव मुख्य सभेत मंजुरीसाठी ठेवण्यात आला आहे. ही जागा शहराच्या दृष्टीने अत्यंत मोक्याची असून भविष्यातील नागरी गरजा लक्षात घेऊन आरक्षण ठेवण्यात आले होते. मात्र आता ही आरक्षणे हटवण्याचा निर्णय घेतल्याने शहराच्या विकास आराखड्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्य शासनाने दिल्लीतील 'भारत मंडपम'च्या धर्तीवर (कन्व्हेन्शन सेंटर) पुण्यातही अशा पद्धतीचे सेंटर उभारण्यासाठी महापालिकेला जागा सुचविण्याचे निर्देश गतवर्षी दिले होते. त्यानुसार महापालिकेने ही जागा शासनाला सुचविली. त्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार पालिका प्रशासनाने या जागेवरील आरक्षण उठविण्यासाठी हरकती-सूचनांची प्रक्रिया राबवून त्यानुसार आता मुख्य सभेत आरक्षण उठविण्याचा प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला आहे.

हा प्रस्ताव मंजूर झाल्यास लोहगाव विमानतळ परिसरात आगामी काळात रुग्णालय, उद्यान, वाहनतळ, मंडई, रस्ता, क्रीडांगण, पाणीपुरवठा केंद्र उभारण्यासाठी जागा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे पुणेकरांनी एकहाती सत्ता दिलेले भाजप या प्रस्तावाला विरोध करणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

विमानतळालगत असलेल्या या 48 एकरांच्या भूखंडावरील आरक्षण उठविण्यामागे महायुतीमधील एका बड्या नेत्याचे हितसंबंध असल्याची चर्चा आहे. त्यामुळे राज्याच्या विकास नियंत्रण नियमावलीत 'भारत मंडपम'चे आरक्षण हा प्रकार नसताना हे आरक्षण टाकण्यात येणार आहे. मंडपच्या नावाखाली ही जागा विकसित केली जाणार असून, त्यावर पंचतारांकित हॉटेल उभारण्याचाही घाट घातला जाणार असल्याची चर्चा आहे. त्यासाठी महायुतीच्या बड्या नेत्यांनी ही सर्व प्रक्रिया शासनामार्फत घडवून आणल्याचे सांगितले जात आहे.

### नियमांवर प्रश्नचिन्ह

» विकास नियंत्रण नियमावलीत 'भारत मंडपम' सारख्या आरक्षणाचा स्पष्ट उल्लेख नसतानाही हा प्रस्ताव पुढे आणण्यात आल्याने कायदेशीर प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार हरकती-सूचनांची प्रक्रिया राबविण्यात आली असली, तरीही नियमबाह्य पद्धतीने आरक्षण बदलले जात असल्याची टीका होत आहे. यामुळे पारदर्शकतेबाबतही शंका व्यक्त केल्या जात आहेत.

### हितसंबंधांची चर्चा

» या निर्णयामागे काही बड्या राजकीय आणि व्यावसायिक हितसंबंध असल्याची चर्चा रंगली आहे. 'भारत मंडपम'च्या नावाखाली या ठिकाणी मोठे प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे बोलले जात आहे. भविष्यात पंचतारांकित हॉटेलसारख्या व्यावसायिक प्रकल्पांची शक्यता व्यक्त होत असून, त्यामुळे सार्वजनिक हितापेक्षा खासगी फायद्याला प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.


# हर्षवर्धन सदगीर ठरला 'डबल महाराष्ट्र केसरी'!

## नाशिकच्या शिरपेचात मानाचा तुरा; नाशिक जिल्ह्याला दुसरी मानाची गदा

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याच्या वाघोलीतील आखाड्यात आज इतिहास लिहिला गेला. चपळता, ताकद आणि गुरुवर्य काका पवारांच्या तालमीत तयार झालेल्या दोन शिष्यांच्या झुंजीत हर्षवर्धन सदगीरने बाजी मारली. सोलापूरच्या बलाढ्य महेंद्र गायकवाडचा गुणांच्या जोरावर पराभव करत हर्षवर्धनने ६८ व्या महाराष्ट्र केसरी किताबावर आपले नाव कोरले.

विशेष म्हणजे, या विजयासोबतच हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा 'डबल महाराष्ट्र केसरी' ठरला असून नाशिक जिल्ह्याला त्याने दुसऱ्यांदा मानाची गदा मिळवून दिली.



स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी माती विभागातून महेंद्र गायकवाड आणि गादी विभागातून हर्षवर्धन सदगीर यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना धुळ चारत अंतिम फेरीत धडक मारली होती. अंतिम सामन्यात हर्षवर्धनने दाखवलेले खेळाचे प्रदर्शन हे रंजक आणि तितकेच शिस्तबद्ध होते.

अंतिम लढत केवळ दोन पैलवानांमधील नव्हती, तर ती एकाच गुरुच्या दोन शिष्यांच्या कौशल्याची कसोटी होती. आंतरराष्ट्रीय कुस्ती संकुलाचे नाव उज्वल करणाऱ्या या दोघांमध्ये सुरुवातीपासूनच चुरस पाहायला मिळाली. मात्र, पहिल्या डावापासूनच हर्षवर्धनने आपली पकड घट्ट ठेवली. महेंद्रने प्रतिकार करण्याचा पुरेपूर प्रयत्न केला, पण हर्षवर्धनची आक्रमक खेळी आणि बचावात्मक चपळता आज वरचढ ठरली.

कुस्तीचा निकाल जाहीर होताच वाघोलीचे मैदान टाळ्यांच्या कडकडाटाने आणि नाशिकच्या घोषणांनी दुमदुमून गेले. आपल्या लाडक्या पैलवानाला सहकाऱ्यांनी खांद्यावर उचलून घेत विजयी मिरवणूक काढली. या ऐतिहासिक विजयाबद्दल हर्षवर्धनला चांदीची गदा, आलिशान फॉर्च्युनर गाडी आणि ५ लाख रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करून गौरवण्यात आले.

### अंतिम दिवसाचा थरार

» स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी माती विभागातून महेंद्र गायकवाड आणि गादी विभागातून हर्षवर्धन सदगीर यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना धुळ चारत अंतिम फेरीत धडक मारली होती. अंतिम सामन्यात हर्षवर्धनने दाखवलेले खेळाचे प्रदर्शन हे रंजक आणि तितकेच शिस्तबद्ध होते.